अर्धसाप्ताहिक
# ब्रम्हपुरी समाचार
संपादक अशोक भैया
RNI No. MAHMUL/2016/69789
E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com
Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25
गुरूवार, दि. 29 जानेवारी 2026 वर्ष 11 वे ✸ अंक 24 वा ✸ ब्रम्हपुरी पाने 6 किंमत 2 रूपये

## प्रजासत्ताक दिनी ब्रम्हपुरीत रक्ताची होळी

### रेती तस्करी करणाऱ्या ट्रॅक्टरने दोन एनसीसी विद्यार्थ्यांना चिरडले

ब्रह्मपुरी/का.प्र.

संपूर्ण देश ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचा उत्साह साजरा करत असताना, ब्रह्मपुरी तालुक्यात मात्र अवैध रेती तस्करीच्या हैदोसाने दोन निष्पाप विद्यार्थ्यांचे आयुष्य संकटात टाकले आहे. नेवजाबाई हितकारिणी शाळेत ध्वजारोहणासाठी जाणाऱ्या दोन एनसीसी (NCC) विद्यार्थ्यांना एका सुसाट रेती तस्कराच्या ट्रॅक्टरने भीषण धडक दिली. या अपघातात एक विद्यार्थी मृत्यूशी झुंज देत असून, प्रशासनाच्या मूक संमतीमुळेच हे रक्ताचे सडे पडत असल्याचा संताप नागरिकांमधून व्यक्त होत आहे.


फिर्यादी सोनू हेमराज भुते यांनी दाखल केलेल्या तक्रारीनुसार, सोमवार, दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी पावणे सहाच्या सुमारास, यश प्रकाश मेश्राम (वय १४) आणि त्याचा मित्र रोनक राजू नागापुरे (वय १४) हे दोघे आपल्या एक्टिवा मोपेडने क्र. MH-34-CP-6139 शाळेत जाण्यासाठी निघाले होते. बोंडेगाव ते कुर्झा रोडवरील राधाकृष्णनगरी जवळ पोहोचले असता, समोरून एन. एच. कॉलेजकडून येणाऱ्या ट्रॅक्टर क्र. MH-34-CD-7668 नेत्यांना जोरदार धडक दिली.

ट्रॅक्टर चालक आरोपी दुर्योधन गजानन तलमले वय ३१, रा. भालेश्वर हा आपला ट्रॅक्टर अत्यंत भरधाव वेगाने आणि निष्काळजीपणाने चालवत होता. धडक इतकी भीषण होती की यश मेश्राम याच्या मेंदूला गंभीर दुखापत झाली असून त्याची प्रकृती सध्या अत्यंत चिंताजनक आहे. तो सध्या ब्रह्मपुरी येथील एका

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## महाराष्ट्र हळहळला...

### विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन



ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक झंझावाती नेतृत्व, प्रशासनावर मजबूत पकड असलेले कणखर नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित अनंतराव पवार (वय ६६) यांचे आज सकाळी बारामती येथे एका दुर्दैवी विमान अपघातात निधन झाले. मुंबईहून बारामतीकडे येत असताना लँडिंगच्या वेळी विमानाला हा भीषण अपघात झाला. या अपघातात अजित पवारांसह विमानातील एकूण ६ जणांचा मृत्यू झाला आहे. या धक्कादायक बातमीमुळे संपूर्ण राज्यावर शोककळा पसरली असून, महाराष्ट्र सरकारने ३ दिवसांचा राज्यव्यापी दुखवटा जाहीर केला आहे.

२२ जुलै १९५९ रोजी अहमदनगर जिल्ह्यात जन्मलेल्या अजितदादांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्या मूळ गावी काटेवाडी (पुणे) येथे झाले. १९८२ मध्ये सहकारी संस्थांच्या माध्यमातून त्यांनी समाजकारणात पाऊल ठेवले. १९९१ मध्ये ते पहिल्यांदा बारामती लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणून निवडून आले. त्यानंतर १९९१ पासून सलग ७ वेळा बारामती विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करत त्यांनी आपला बालेकिल्ला अबाधित राखला. महाराष्ट्राचे सर्वाधिक वेळा ५ वेळा उपमुख्यमंत्री होण्याचा बहुमान त्यांना मिळाला. त्यांनी जलसंपदा, वित्त, नियोजन आणि ऊर्जा यांसारखी महत्त्वाची खाती समर्थपणे सांभाळली.

अजित पवार हे राज्याच्या राजकारणात 'दादा' या नावाने प्रसिद्ध होते. कामातील स्पष्टवक्तेपणा, प्रशासकीय शिस्त आणि निर्णयाची तत्परता ही त्यांची खास ओळख होती. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. राज्यात ३ दिवसांचा दुखवटा घोषित.

## प्रशासकीय 'तमाशा' सामान्यांच्या गळयाला फास

### रखडलेल्या महामार्गाच्या कामांसाठी प्रशांत डांगे यांचे आमरण उपोषण




**हे आंदोलन वैयक्तिक फायद्यासाठी नाही, तर रस्त्यावरून चालणाऱ्या प्रत्येक निष्पाप जीवाच्या रक्षणासाठी आहे. जोपर्यंत कामाचा दर्जा सुधारत नाही आणि उड्डाणपुलाचे काम मार्गी लागत नाही, तोपर्यंत माघार नाही.'**
**- प्रशांत डांगे, सामाजिक कार्यकर्ते**

ब्रह्मपुरी/का.प्र.

रस्ते विकासाच्या नावाखाली जनतेच्या जिवाशी खेळण्याचा परवाना प्रशासनाने ठेकेदारांना दिला आहे का? असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे. ब्रह्मपुरी–वडसा महामार्ग आणि ब्रह्मपुरी–आरमोरी मार्गावरील उड्डाणपुलाचे काम कासवगतीने आणि अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याने, अखेर सामाजिक कार्यकर्ते प्रशांत डांगे यांनी प्रशासनाविरुद्ध 'आरपारचा लढा' पुकारत आमरण उपोषणाचे हत्यार उपसले आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून ब्रह्मपुरी परिसरातील या महामार्गांचे काम अर्धवट अवस्थेत आहे. उड्डाणपुलाचे रखडलेले बांधकाम आणि ठिकठिकाणी पडलेले खड्डे यामुळे हा मार्ग प्रवाशांसाठी 'डेथ ट्रॅप' ठरत आहे. अपघातांची मालिका सुरू असतानाही प्रशासन आणि संबंधित कंत्राटदार कुंभकर्णी झोपेत आहेत. वारंवार निवेदने देऊनही जेव्हा यंत्रणा ढिम्म हलली नाही, तेव्हा जनतेचा आवाज बुलंद करण्यासाठी प्रशांत डांगे यांना उपोषणाचा टोकाचा निर्णय घ्यावा लागला.

**प्रशासकीय संवेदना हरवली ?**

लोकशाहीत उपोषण हा शेवटचा मार्ग मानला जातो, मात्र ब्रह्मपुरीतील परिस्थिती पाहता प्रशासनाची संवेदना पूर्णपणे हरवल्याचे चित्र आहे. निकृष्ट साहित्याचा वापर आणि सुरक्षेच्या नियमांकडे केलेले दुर्लक्ष हे केवळ तांत्रिक चुका नसून, तो थेट नागरिकांच्या खुनाचा प्रयत्न आहे, अशा शब्दांत स्थानिकांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

**जनतेचा रेटा वाढतोय :**

प्रशांत डांगे यांच्या या लढ्याला आता जनआंदोलनाचे स्वरूप प्राप्त होत आहे. हे आंदोलन कोणत्याही राजकीय पक्षाचे नसून सर्वसामान्यांच्या अस्तित्वाचा लढा असल्याने विविध सामाजिक संस्था, व्यापारी संघटना आणि नागरिकांनी उपोषणस्थळी गर्दी करण्यास सुरुवात केली आहे. एकीकडे प्रशांत डांगे यांचे बिघडणारे आरोग्य आणि दुसरीकडे जनतेचा वाढता आक्रोश यामुळे प्रशासनाची गोची झाली आहे. आता तरी प्रशासन या 'रखडलेल्या' विकासाला गती देणार की एखाद्या मोठ्या दुर्घटनेची वाट पाहणार? हा प्रश्न अनुत्तरित आहे.

ब्रह्मपुरी–वडसा आणि आरमोरी रोडवरील उड्डाणपुलाचे काम तातडीने पूर्ण करावे. कामाच्या निकृष्ट दर्जाची उच्चस्तरीय चौकशी व्हावी. अपघात रोखण्यासाठी सूचना फलक आणि संरक्षक कठडे बसवावेत. दोषी ठेकेदारावर कठोर कारवाई करावी. या मुख्य मागण्यासाठी हा संघर्ष सुरू आहे. हा लढा केवळ प्रशांत डांगे यांचा नसून, सुरक्षित प्रवासाचा हक्क मागणाऱ्या प्रत्येक ब्रह्मपुरीकराचा आहे.



## संपादकीय...

# भ्रष्टाचाराचे कुरण

नोकरशाहीतील अमर्याद अधिकार आणि त्यामुळे होणारा भ्रष्टाचार देशाच्या स्वप्नांना मारक ठरत आहे. देशातील भ्रष्ट सरकारी कर्मचारी दरवर्षी ९२१ अब्ज रुपये लाच घेतात, असे एका अहवालातून समोर आले आहे. आता राज्य सरकारच्या तपास यंत्रणा आपल्याविरुद्ध कारवाई करू शकत नसल्याने आजवर खुशीची गाजरे खाणाऱ्या केंद्र सरकारच्या भ्रष्ट कर्मचाऱ्यांसाठी धोक्याची घंटा वाजली आहे. याचे कारण म्हणजे लाचखोरी आणि भ्रष्टाचार प्रकरणात गुंतलेल्या केंद्रीय कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांच्याविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत आरोपपत्र सादर करण्याचे अधिकार राज्याच्या यंत्रणेला असून गुन्हा दाखल करण्यासाठी सीबीआयच्या पूर्वपरवानगीची गरज नाही, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. राज्यातील भ्रष्ट सरकारी कर्मचाऱ्यांविरोधात राज्याचे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, तर केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांविरोधात सीबीआयचे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कारवाई करते. हे दोन्ही विभाग त्या त्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त कारवाई करत नाही. मात्र न्यायालयाच्या निकालानुसार कामातील सोय आणि तपासाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांविरोधातील भ्रष्टाचाराचा तपास सीबीआयकडे, तर राज्य सरकारच्या कर्मचाऱ्यांविरोधातील तपास राज्याच्या भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागांकडे दिला जातो.

राजस्थानातून सुरू झालेल्या कायद्याच्या लढाईने आता देशभरातली भ्रष्ट अधिकाऱ्यांची झोप उडवली आहे. तेथील एका केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्याने राज्य सरकारच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला त्याच्याविरोधात कारवाई करण्याचा अधिकार नसल्याचा युक्तिवाद उच्च न्यायालयात केला होता. न्यायालयाने तो फेटाळल्यानंतर आता त्यावर सर्वोच्च न्यायालयाने हा निकाल दिला आहे. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यातील कलम १७ नुसार राज्याच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला केंद्र सरकारच्या कर्मचाऱ्यांविरोधात चौकशी करण्याचा तसेच आरोपपत्र दाखल करण्याचा पूर्ण अधिकार आहे, ही बाब स्पष्ट झाल्याने आता भ्रष्टाचारविरोधातील कारवाई किती प्रमाणात वाढेल हे काही सांगता येत नाही. केंद्र आणि राज्य सरकारमधील कर्मचारी किती भ्रष्ट आहेत याचा अनुभव जनता पदोपदी घेतच असते. भ्रष्ट अधिकाऱ्यांविरोधात कोण कारवाई करू शकते हे जनतेसाठी अजिबात महत्त्वाचे नाही. भ्रष्टाचार कमी व्हावा, किंबहुना तो पूर्णपणे नष्ट व्हावा अशीच जनतेची अपेक्षा आहे. राज्यातील जनतेचा दोन्ही शासनातील कर्मचाऱ्यांशी संबंध येतच असतो. त्यातही खरी मेख ही आहे की, या कर्मचाऱ्यांना स्वखुशीने लाच देऊ करणाऱ्या लोकांचेही प्रमाण प्रचंड आहे. कायद्याने लाच देणे आणि घेणे हे दोन्हीही गुन्हे आहेत. क्वचित लाच घेणारा पकडला तरी जातो. पण लाच देऊ करणारा अथवा लाच देताना कोणी पकडला गेला असे कधी ऐकिवात नाही.

भारतात जे दहा सर्वात भ्रष्ट विभाग ओळखले जातात त्यात प्राप्तिकर, गृहनिर्माण आणि नगरविकास विभाग, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, परिवहन विभाग सहाव्या क्रमांकावर, वीज विभाग, महसूल विभाग दुसऱ्या क्रमांकावर, तर सर्वात पहिला क्रमांक पोलीस विभागाचा आहे. इतर विभाग तर या सगळ्या विभागांमध्ये नगण्य समजले जातात. मात्र एकंदरीत येणाऱ्या तक्रारींचा निपटारा करणे हे राज्य लाचलुचपत प्रतिबंधक विभागासमोरील मोठे आव्हान आहे. त्यात केंद्र सरकारच्या भ्रष्ट कर्मचाऱ्यांमागे किती पळायचे यालाही मर्यादा आहेत. सर्वोच्च न्यायालयाने कारवाई करण्यासाठीचा अधिकार स्पष्ट केला असला तरी केंद्र सरकारच्या भ्रष्टाचाराविरोधात किती तक्रारदार राज्यातील यंत्रणेकडे धाव घेतात आणि किती प्रकरणे नोंदवली जातात हे भविष्यात स्पष्ट होईल. मात्र किमान हद्दीचा वाद मिटला हेही थोडके नसे.

# नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयाच्या एनसीसी कॅडेटची दैदिप्यमान कामगिरी



ब्रह्मपुरी/का.प्र.

ने. ही. कॉलेज, ब्रह्मपुरी येथील २० महाराष्ट्र बटालियन एनसीसी, नागपूर अंतर्गत चार कॅडेट्सची केंद्रीय सशस्त्र पोलीस दलात (CAPF) आणि नेव्ही मध्ये निवड झाल्याने नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, एनसीसी युनिट तसेच परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

या निवडीत एक्स-कॅडेट रविंद्र वांढरे आणि कॅडेट सानुज निहाते यांची यांची सी आई एस एफ मध्ये, एक्स कैडेट अजय नेवारे यांची सी आर पी एफ मध्ये आणि एक्स कैडेट मुस्कान कूड़ावले हिची नेव्ही एस एस आर साठी निवड झाली आहे. या अभूतपूर्व यशाबद्दल या सर्व निवड झालेल्या कॅडेटचा सत्कार आणि शुभेच्छा कार्यक्रम महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून कार्यकारी प्राचार्य डॉ. एस.एम. शेकोकर आणि विशेष अतिथी तरुण उद्योजक गौरव भैया यांची उपस्थित लाभली. प्रा विनोद नरड, कैप्टन अभिजीत परकरवार आणि प्रा. रेवनदास मधुकर बोरकर यानी कार्यक्रमाला उपस्थित राहून सर्व कॅडेटचे कौतुक केले आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

नेवजाबाई भैया हितकारिणी संस्थेचे सचिव अशोक भैया यांनी सर्व चयनित कैडेट्स चे विशेष अभिनंदन केले. कार्यक्रमाचे संचालन कैडेट प्रियशील चंदनखेड़े यानी केले आणि आभार प्रदर्शन कैडेट अंकुश महाजन याने केले. कार्यक्रमाला सर्व कैडेट्स उपस्थित होते. एन सी सी मधील शिस्त, चिकाटी, देशभक्ती व नेतृत्वगुण यामुळेच असे यश शक्य होत असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

# दोन चिमुकल्यांच्या आईला मिळाले नवे जीवन

## तनय देशकर यांच्या पुढाकाराने महिलेवर हृदयाची मोफत शस्त्रक्रिया

ब्रम्हपुरी/का.प्र.

हळदा येथील दोन लहान मुलींची आई मनिषा रविंद्र भोयर यांचे हृदयाच्या वॉल्वचे अत्यंत गंभीर शस्त्रक्रिया भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हा सरचिटणीस तनय देशकर यांच्या पुढाकाराने पूर्णपणे मोफत करण्यात आली. या यशस्वी शस्त्रक्रियेमुळे एका आईचा जीव वाचला असून तिच्या कुटुंबाचा संसार पुन्हा उभा राहिला आहे.

मनिषा भोयर यांना हृदयाच्या वॉल्वचा गंभीर आजार असून तातडीने वॉल्व बदलण्याची आवश्यकता होती. मात्र घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची असल्याने उपचारांचा खर्च परवडणारा नव्हता. मनीषा भोयर यांचे पती रविंद्र भोयर हे ड्राइवर चे काम करतात. मनीषा यांच्या आजाराबाबत हळदा येथील अक्षय जरूरकर यांना सांगितले असता त्यांनी तनय देशकर यांना संपर्क केला. अशा कठीण आणि निराशाजनक परिस्थितीत तनय देशकर यांनी तात्काळ संपूर्ण प्रकरणाची माहिती घेत मदतीसाठी पुढाकार घेतला. पुढील उपचारांसाठी मनीषा भोयर यांना तात्काळ नागपूर येथील रुग्णालयात पाठविण्यात आले.

त्या ठिकाणी राज्याचे मुख्यमंत्री नाम. देवेंद्र फडणवीस यांच्या विशेष सहकार्याने नागपूर येथील आशा हॉस्पिटल मध्ये मनिषा भोयर यांचे हृदयाच्या वॉल्वचे शस्त्रक्रिया यशस्वीपणे पार पडली. अनुभवी डॉक्टरांच्या चमूने केलेल्या या ऑपरेशननंतर मनिषा भोयर यांची प्रकृतीने स्थिर असून, त्या आपल्या गावी परतल्या आहेत.

राजकारण हे केवळ सत्तेसाठी नसून समाजाच्या दु:खात सहभागी होण्यासाठी असते, याचे जिवंत उदाहरण तनय देशकर यांनी पुन्हा एकदा दिले आहे. गरजू रुग्णांसाठी धावून जाणे, उपचारासाठी प्रयत्न करणे आणि प्रत्यक्ष मदत करून जीवन वाचवणे, हे त्यांच्या सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवते.

## विनोदिनी

काल रामलाल डेंटिस्टकडे गेला... वेटिंग रूममध्ये फक्त एकच माणूस बसलेला होता... तो टीव्ही पाहत होता... टीव्हीवर गोलमाल २ चित्रपट लागला होता...
रामलालला कोणीतरी बोलवेल या अपेक्षेने तो आणि दुसरा माणूस दोघेही शांतपणे पिक्चर बघत बसले... पण कोणीच आले नाही! ??
दीड तासाने पिक्चर संपला...
तो माणूस उठला आणि डायरेक्ट केबिनमध्ये गेला... थोड्या वेळाने त्याने रामलालला आत बोलावलं....
कारण....
तोच डेंटिस्ट होता...!

# अध्यात्माची शिदोरी जतन करून ठेवली तर शेवटच्या क्षणापर्यंत उपयोगी येईल

## हभप सुनिल गुरनुले महाराज यांचे बोरगाव येथील भागवत सप्ताह समारोपप्रसंगी वक्तव्य

ब्रह्मपुरी/का.प्र.

"अध्यात्माची शिदोरी प्रत्येकांने जतन करून ठेवावे ती प्रत्येकाच्या नशिबी नसते. कारण जन्म-मृत्यूच्या चक्रव्युहात माणसाला ती भविष्यात शेवटच्या क्षणी उपयोगी पडणार आहे. यासाठी कलियुगात चांगले सामाजिक कार्य आपल्या हातून कसे घडतील अशी आपली वर्तणूक असली पाहिजे. पाप-पुण्याच्या भागीदारीतून मुक्त होण्यासाठी आणि समाजाचे ऋण फेडण्यासाठी अध्यात्माची खऱ्या अर्थाने गरज आहे. पौराणिक कथेच्या माध्यमातून भगवंतांनी सांगितलेल्या गोष्टी साक्षात खऱ्या ठरत आहेत. त्यामुळे प्रत्येकाने अध्यात्म्याचे ज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी वेळ काढावा. भविष्यात हे मौलिक ज्ञान नक्कीच उपयोगी पडतील आणि दुसऱ्याला प्रेरणा देणारे ठरतील," असे प्रतिपादन ज्येष्ठ भागवतकार सुनील गुरनुले महाराज यांनी व्यक्त केले. ते बोरगाव येथील ग्रामवासी जनतेच्या वतीने आयोजित भागवत सप्ताहाच्या गोपाल काल्याच्या समारोपीय कार्यक्रमाप्रसंगी भागवत कथेचा सार ज्ञानार्जन देतांना विचार व्यक्त करत होते.



शनिवार १७ जानेवारी ते शुक्रवार दिनांक २३जानेवारी २०२६ पर्यंत सात दिवस चाललेल्या भागवत सप्ताहाचा समारोप ह. भ.प. सुनील गुरनुले महाराज रा. कासवी यांच्या हस्ते गोपाल काला व महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली. याकालावधीत ग्रामसफाई, ध्यान, रामधून, सामुदायिक प्रार्थना, हरीपाठ, विविध देवी-देवतांची मिरवणूक, कलश यात्रा, भजन संध्या कार्यक्रम यासारखे विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले. सात दिवस चाललेल्या भागवत सप्ताह यशस्वी करण्यासाठी बोरगाव येथील नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता.

**गुरुवार दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सात वाजता कलश यात्रा काढण्यात आली. ती आकर्षक स्वरूपाची होती. महिलांनी डोक्यावर दिव्य ज्योत घेतली होती. सर्वत्र गावभर गल्ली गल्लीत दिव्यांची रोषणाई पसरलेली होती. विविध संत महात्म्यांचे बोलके चित्र अधोरेखांकित करणाऱ्या विविध स्वरूपाच्या झाक्या तयार करण्यात आल्या होत्या. त्यामध्ये संत गोराकुंभार, राधा-कृष्ण, संत जनाबाई, नामदेव महाराज यांच्या कार्याची प्रशंशा करणारे बोलके चित्र साकारण्यात आले हाते. कोरभर भाकर खाऊन स्वतः पहाटेची जनाबाईची ओव्या गाऊन दळण कांडून कुटुंबासाठीची चाललेली आईची धडपड ! नंतर आधुनिक युगात दारूच्या आहारी जाणाऱ्या व्यसनाधीन कुटुंबाची व्यथा अशा अनेक समाज जागृती करणाऱ्या झांक्यातून प्रत्यक्षदर्शी दाखवण्यात आल्या.**

# ने.हि. महाविद्यालय, ब्रम्हपुरी येथे नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे जयंती



ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात आझाद हिंद सेनेचे प्रमुख, प्रखर स्वातंत्र्य सेनानी नेताजी सुभाषचंद्र बोस व हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरेची जयंती उत्सव साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने सर्वप्रथम प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर व डॉ राजेंद्र डांगे यांनी दोन्ही प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी घोषणा देण्यात आल्या. त्यानंतर उपस्थित डॉ धनराज खानोरकर, डॉ असलम शेख, डॉ रतन मेश्राम, डॉ योगेश ठावरी, डॉ अतुल येरपुडे, प्रा बालाजी दमकोंडवार, डॉ भीमा डांगे, डॉ कुलजित शर्मा, डॉ पद्माकर वानखडे, डॉ मिलिंद पठाडे, प्रा जयेश हजारे, प्रा मनीषा लेनगुरे, प्रा कृतिका बोरकर, दत्तू भागडकर, शशिकांत माडे व इतर सर्व कर्मचारी यांनी पुष्प वाहून अभिवादन केले. संचालन व आभार प्रदर्शन समितीचे डॉ धनराज खानोरकर मानले. यशस्वीतेसाठी समिती सदस्यांनी मोलाचे सहकार्य केले.

# भागवत सप्ताह कार्यक्रमात कायदेविषयक मार्गदर्शन

ब्रम्हपुरी/का.प्र.

शनिवार, दिनांक २४ जानेवारी २०२५ ला मौजा




लाखापुर, तालुका ब्रह्मपुरी येथे हरिनाम भागवत सप्ताह निमित्त सुरू असलेल्या कार्यक्रमाची वेळी पोलीस स्टेशन ब्रह्मपुरीच्या वतीने कायद्याविषयी नागरिकांना माहिती देण्यात आली.

पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार अरुण पिसे, पोलीस हवालदार राजेंद्रजी मंडळ, तसेच पोलीस अंमलदार सदानंद पाल यांनी रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत मोटार वाहन कायदा, अमली पदार्थ विरोधी कायदा, सोबतच नवीन निर्माण झालेले कायदे याविषयी माहिती दिली. बालकांच्या लैंगिक शिक्षण संरक्षण अधिनियम तसेच इतरही कायद्यांबद्दल गावकरी मंडळी तसेच विद्यार्थी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी बहुसंख्य पुरुष स्त्री मंडळी हजर होते.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315

# झाडीबोलीची सांस्कृतिक संपन्नता व लोकोत्सव 'संजोरी'तून प्रतीत

## जिल्हा मराठी भाषा समिती उपक्रमात डॉ. मुसणे यांचे प्रतिपादन

चंद्रपूर/प्रतिनिधी

'कोल्हापूरच्या भाषा विकास संशोधन संस्थेने प्रकाशित केलेल्या झाडीपट्टीतील लेखक, कवी, समीक्षक डॉ.धनराज खानोरकर यांनी झाडीपट्टीतील भूप्रदेशाचे, लोकजीवनाचे व सांस्कृतिकतेचे लालित्यपूर्ण चित्रण 'संजोरी' या ग्रंथाद्वारे प्रकाशित झाले आहे. गाव मातीशी नातं जोडत तुम्ही तत्व जोपासणाऱ्या या मातीच्या मास्तराने झाडीपट्टीतील खाद्यसंस्कृती, सण, उत्सव, पारंपारिक खेळ, लोककला, लोककलावंत, कलेचे उपासक आणि कृषी संस्कृतीचे झाडीबोलीतून बहारदार वर्णन संजोरीतून केली आहे. झाडी प्रदेशातील लोकजीवन बोली परंपरा सांस्कृतिक संपन्नतेत जाऊन संवेदनशील कलात्मक देण्याकरिता चित्र म्हणजे 'संजोरी' आहे. लोकोत्सवाचा हा केवळ दस्ताऐवजच नसून त्यातून झाडीबोलीची सांस्कृतिक संपन्नता व एकंदरीत लोकोत्सव सकसपणे प्रतीत झाले आहे,' असे मार्मिक भाष्य, भाष्यकार व समीक्षक डॉ.राजकुमार मुसणेंनी केले.

ते चंद्रपुर येथील श्यामाप्रसाद मुखर्जी वाचानालयात डॉ. धनराज खानोरकर यांच्या बहुचर्चित 'संजोरी' ग्रंथावर बोलत होते. अध्यक्षस्थानी झाडीबोलीचे भाष्यकार डॉ. श्याम मोहरकर, अनिल बोरगमवार, डॉ.विद्याधर बन्सोड, रत्नाकर नलावडे, इरफान शेख उपस्थित होते. जिल्हा मराठी भाषा समिती, जिल्हा ग्रंथालय व वि.सा.संघ, गोंडवन शाखेच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पुढे डॉ.मुसणे म्हणाले की, अर्थातच मंडई पासून ते मोहफुलापर्यंत आणि जीवनदायीनी नदी वैनगंगेपासून ते नाटकांपर्यंत विविध विषय पंचवीस लेखाद्वारे साकार करीत झाडीपट्टीच्या सांस्कृतिकतेचे वैभवलेणे या ग्रंथाद्वारे प्रतीत झाले आहे. 'संजोरी' या ग्रंथाद्वारे अस्सल झाडीच्या शब्द श्रीमंतीचा भाव लक्ष्यवेधी आहे. झाडी प्रदेशातील समाज ,भाषा, साहित्य आणि संस्कृतीचा केलेला हा विश्लेषक अभ्यास पुढच्या पिढीसाठी पथदर्शक ठरेल, अशा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी गोपाल शिरपूरकरांच्या 'भूईकोर'वर प्रदीप देशमुख, डॉ श्याम मोहरकरांच्या 'लालगुंजी'वर डॉ राम वासेकर, अविनाश पोईनकरांच्या 'सूरजागड विकास की विस्थापना'वर नरेशकुमार बोरीकर तर सुनिल बावणेंच्या 'स्याडा कोटासा भरते'वर डॉ विद्याधर बन्सोडांनी विचार मांडले. संचालन व आभार प्रदर्शन मीना बंडावार यांनी केले.

# रणमोचन जिल्हा परिषद उच्च प्राथ. शाळेत शहीद बालक स्मृतीदिन साजरा

## ‘त्या’ चारही शहीद बालकांना गावकऱ्यांनी वाहिली भावपूर्ण श्रध्दांजली



ब्रह्मपुरी/का.प्र.

दि. २२ जानेवारी १९९९ रोजी गांगलवाडी बिट-अंतर्गत तालुक्यातील बरडकिन्ही येथून क्रीडा संमेलनात विजयश्री प्राप्त करून रणमोचन गावाकडे ट्रॅक्टरने परत येत असतांना विरुद्ध दिशेने भरधाव वेगात येणाऱ्या मिनीट्रकने रुई (विद्यानगर जवळ) मोठा अपघात घडला होता. ‘त्या’अपघातामध्ये रनमोचन जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेतील चार विद्यार्थी शहीद झाले तर अनेक विद्यार्थी किरकोळ जखमी झाले होते. त्या शहीद विद्यार्थ्यांमध्ये प्यारेनंद पंढरी शंभरकर, प्रदीप वामन ठाकरे, शांताराम नवलाजी राऊत, प्रकाश शंकर ठाकरे यांचा समावेश होता. त्या चारही बालकांचा २६ वा शहीद बालक स्मृतिदिन कार्यक्रम गुरुवार दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी रणमोचन येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत संपन्न झाला. आजही ब्रह्मपुरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या गांगलवाडी बिटातील जवळपास २४ शाळेत हा काळा दिवस म्हणून पाळला जातो.

सर्वप्रथम शहीद स्तंभाचे पूजन व शहीद बालकांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी रणमोचन ग्रामपंचायतींच्या सरपंच्या नीलिमा राऊत यांनी भूषवले. उपाध्यक्ष म्हणून शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रेशम शेंभरकर उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून उपसरपंच सदाशिव ठाकरे, पत्रकार विनोद दोनाडकर, नवलाजी राऊत, वामन ठाकरे, वनिता ठाकरे, शर्मिला शेंभरकर, ग्रामपंचायत सदस्या अश्विनी दोनाडकर, मंदाबाई साहारे, शाळा व्यवस्थापन समितीच्या सदस्यां लक्ष्मीबाई दोनाडकर, जोशना बुराडे, अस्मिता पिलारे पोलीस पाटील, पार्वता ठाकरे, नीलकंठ राऊत, केशव राऊत, रमेश रासेकर, धनलाल शेंभरकर, अंगणवाडी सेविका सोनी शेन्डे, दादाजी पिलारे अध्यक्ष तंटामुक्त समिती. आनंदराव मेश्राम, शाळेचे मुख्याध्यापक नरेंद्र आंबोरकर सर, प्रीती बालपांडे मॅडम, स्मिता पिल्लेवान मॅडम, महिला पुरुष ग्रामस्थ विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. याप्रसंगी त्या शहीद चारही विद्यार्थ्यांना दोन मिनिटं मौन पाडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाचे यशस्वी सूत्रसंचालन काशिनाथ हेडाऊ सर, तर पाहुण्यांचे आभार शैला राऊत मॅडम यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाकरिता कल्पना संगत साहेब, आणि पिंकु कावळे यांनी सहकार्य केले.

**जल है तो कल है...**

# एलएमबी स्कुलमध्ये Flag Making Activity



ब्रम्हपुरी/का.प्र.

एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये प्रजासत्ताक दिनाच्या निमित्याने २३ जानेवारी ला प्रि-स्कुलमधील विद्यार्थ्यांनी flag making activity या उपक्रमातर्गत तिरंगी पोशाखात उपस्थित राहून देशभक्ती प्रकट केली. मुलांनी तीन रंगाचे विविध खाद्य पदार्थ टिफिन मध्ये आणले होते. मुलांना या दिवसाचे महत्व कळावे यासाठी उपक्रम घेण्यात आले. या उपक्रमामध्ये मुलांनी तिरंगा यातील तीन रंगाचे पेपर आणले होते व त्याद्वारे त्यांनी भारताचा तिरंगा तयार केला. तसेच मुलांना तीन रंगाच्या पोशाखात शाळेत बोलवण्यात आले होते. या वेळी या छोट्या विद्यार्थ्यांचे शिस्तबध्द पद्धतीने राष्ट्रगित घेण्यात आले. तसेच संविधान देखिल शिक्षकांच्या पाठोपाठ म्हटले. या कार्यक्रमाचे उत्साह पूर्व समापन करताना त्यांची प्रभात फेरी देखील काढण्यात आली. या मुलांचे विशेष कौतुक करण्यासाठी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव तथा शाळेचे अध्यक्ष अशोक भैया उपस्थित होते. मुलांसमवेत शाळेच्या प्रांगणामध्ये फोटो काढण्यात आले. या उपक्रमाला शाळेच्या संचालिका आशिता भैया मॅडम, तसेच पर्यवेक्षिका रश्मी झोडे मॅडम यांनी देखिल मुलांचे विशेष कौतुक केले. सर्वात शेवटी मुलांनी भारत माता की जय असा जोरदार जल्लोष करत उपक्रमांची सांगता केली.

✽✽✽✽✽✽

# कवी अमरदीप लोखंडे यांचा संत गाडगे बाबा स्वच्छतादूत पुरस्काराने गौरव

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील अऱ्हेरनवरगांव येथील रहिवासी कवी, सामाजिक कर्तव्याची



बांधिलकी जोपासणारे , सामाजिक, शैक्षणिक, वृक्ष लागवड या कार्यात तळमळणारे आणि जनतेचे आरोग्य सुदृढ, निरोगी राहावे यासाठी परिसर झाड लोट करून स्वच्छ ठेवणारे अमरदीप लोखंडे यांच्या कार्याची दखल घेत मदत सामाजिक संस्था, नागपूर यांनी १६ नोव्हेंबर २०२५ रोजी श्री गुरुदेव सेवाश्रम, नागपूर येथे पार पडलेल्या राज्यस्तरीय सामाजिक कार्यकर्ता संमेलन पुरस्कार सोहळयात संत गाडगेबाबा स्वच्छतादूत पुरस्कार, प्रमाणपत्र व भारताचे संविधान संस्थेचे सचिव दिनेशबाबू वाघमारे व पदाधिकारी यांनी देऊन त्यांचा गौरव केला.

त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल नातेवाईक, मित्रमंडळी यांनी त्यांचेवर अभिनंदनचा वर्षाव केला असून सतत असेच कार्य हातून घडत राहण्याच्या शुभेच्छा दिल्या. या अगोदर त्यांना विविध संस्थांच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर समजरत्न छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले , जीवन गौरव यासारखे व शैक्षणिक क्षेत्रातील तालुका ते राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनीचे पुरस्कार मिळालेले आहेत.

❁❁❁❁❁❁❁

# बीटस्तरीय शालेय बालक्रीडा व सांस्कृतिक महोत्सव संपन्न

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या ब्रम्हपुरी बीटांचे बीट स्तरीय शालेय बालक्रीडा स्पर्धा व सांस्कृतिक महोत्सव जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वायगाव चे प्रांगणात नुकतेच संपन्न झाले. या स्पर्धेत ब्रम्हपुरी, वायगाव, सोंदरी या तीन केंद्रातील ३० शाळांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेचे उद्घाटन ब्रम्हपुरी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी रवींद्र घुबडे यांच्या हस्ते, सरपंच गुरुदेव तूपत यांच्या अध्यक्षतेखाली, प्रमुख अतिथी उपसरपंच चक्रधर ढोके, गटशिक्षणाधिकारी विद्या शेळके, शाळा समितीचे अध्यक्ष प्रमोद कटलम, चौधरी वनरक्षक, दीपाली मोहिले, प्रवीण मोहरले, पुरुषोत्तम लोणारकरे यांच्या उपस्थितीत पार पडले. विस्तार अधिकारी विद्या शेळके, केंद्र प्रमुख धनराज भोयर, मीना डांगे, वैजयंती वाळके, यांच्या मार्गदर्शनात सांघिक सामने व सांस्कृतिक कार्यक्रम पार पडले.

चिंचोली शाळेने जनरल चॅम्पियन प्राप्त केले. बक्षीस वितरण संदीप तुपट, सरपंच गुरुदेव तूपट, जीवन डुंबरे, चंद्रभान चौधरी, हितेश कुर्वे, लेकराम सावसाकडे, बिंदुसार उके, जगदीश गणवीर, अजय रामटेके, शीला बोरकुटे, युवराज शेंडे, प्रकाश मानगुळधे, संतोष श्रीरामे, यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचलन जगदीश मेहेर यांनी केले. प्रास्ताविक विस्तार अधिकारी विद्या शेळके, अहवाल वाचन सचिव प्रल्हाद कोकोडे यांनी केले.

●●●●●●●

# गरीब रूग्णांच्या खिशाला कात्री लागणार.!

## राज्यातील शासकीय रूग्णालयांतील 'मोफत उपचार' आता बंद होणार...

ब्रम्हपुरी /प्रतिनिधी

राज्यातील सर्वसामान्यांसाठी एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. शासकीय रुग्णालयांमध्ये मिळणारे मोफत उपचार आता इतिहास जमा होणार असून, रुग्णांना यापुढे आरोग्य सुविधांसाठी आपले खिसे रिकामे करावे लागणार आहेत. राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने १६ जानेवारी रोजी यासंदर्भात नवा शासन निर्णय (GR) जारी केला असून, लवकरच याची अंमलबजावणी सुरू होणार आहे.

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून १५ ऑगस्ट २०२३ पासून राज्य शासनाने सर्व शासकीय रुग्णालयांत मोफत उपचार देण्याची घोषणा केली होती. मात्र, अवघ्या अडीच वर्षांच्या आतच सरकारने हा निर्णय फिरवला आहे. नवीन आदेशानुसार, आता रुग्णांना उपचाराच्या स्वरूपानुसार ठराविक शुल्क भरावे लागेल. यामध्ये बाह्यरुग्ण विभाग (OPD) नोंदणीपासून ते मोठ्या शस्त्रक्रियांपर्यंत सर्वच सेवा सशुल्क करण्यात आल्या आहेत. रुग्णालयातील विविध सेवांसाठी खालीलप्रमाणे शुल्क आकारले जाण्याची शक्यता आहे. ध्झ्अ नोंदणी शुल्क (अनिवार्य), रुग्ण भरती (प्रति दिवस) १५ रुपये, MRI स्कॅन १,६०० रुपये यासह इतर सुविधा रक्त चाचण्या, एक्स–रे आणि सीटी स्कॅनसाठी ठराविक शुल्क व शस्त्रक्रिया यासाठी शासनाने निश्चित केलेले दर राहणार आहेत.

शासकीय रुग्णालये हा गोरगरीब आणि कष्टकरी जनतेसाठी उपचाराचा एकमेव आधार असतो. खासगी रुग्णालयांचे अवाढव्य बिल न परवडणारे रुग्ण मोठ्या आशेने जिल्हा सामान्य रुग्णालयात येतात. मात्र, आता तिथेही पैसे मोजावे लागणार असल्याने 'सरकारने गरिबांची थट्टा मांडली आहे का?' असा सवाल विचारला जात आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्य रुग्णांवर मोठा आर्थिक भार पडणार असून, शासनाने या निर्णयाचा तातडीने फेरविचार करावा, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. मार्गदर्शक सूचना प्राप्त होताच ब्रम्हपुरीसह संपूर्ण जिल्ह्यात या निर्णयाची अंमलबजावणी कडकपणे राबविली जाण्याची शक्यता आहे.

**प्रशासनाची भूमिका :**

'शासकीय रुग्णालयातील नवीन शुल्क आकारणी संदर्भातील शासन निर्णय निर्गमित झाला आहे. मात्र, अद्याप या निर्णयाच्या अंमलबजावणी संदर्भातील सविस्तर मार्गदर्शक सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. त्या प्राप्त होताच रुग्णालय स्तरावर याची अंमलबजावणी सुरू केली जाईल.'

– डॉ. प्रीतम खंडाळे
वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय ब्रह्मपुरी

# ब्रम्हपुरीत संतश्रेष्ठ तुकाराम महाराज जयंती सोहळा व वर-वधू परिचय मेळावा

ब्रह्मपुरी/का.प्र.

अखिल कुणबी समाज मंडळ ब्रह्मपुरी, कुणबी समाज संघर्ष समिती, कुणबी महिला संघर्ष समिती, युवा कुणबी संघर्ष समिती ब्रह्मपुरीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे या वर्षी सुद्धा कुणबी समाजाचे आराध्य जगद्गुरु संत श्रेष्ठ तुकाराम महाराज जयंती सोहळा दि. ०२ फेब्रुवारी २०२६, सोमवारला जगद्गुरु संत श्रेष्ठ तुकाराम महाराज स्मारक, समाज कार्यालय हत्तीगोटा कहाली रोड ब्रह्मपुरी येथे आयोजित करण्यात आला आहे.

त्यानिमित्ताने तुकाराम महाराज पालखी मिरवणूक, भक्ती संगीत कार्यक्रम, समाज प्रबोधन पर व्याख्यान वृषभ प्रमोद राऊत (युवा प्रवक्ता राष्ट्रीय ओबीसी महासंघ नागपूर), वर वधू परिचय मेळावा व स्मरणिका विमोचन, तसेच समाजाचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका यांचा जाहीर सत्कार करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटक तथा सत्कारमूर्ती नानाभाऊ पटोले माजी विधानसभा अध्यक्ष महाराष्ट्र राज्य तथा आमदार साकोली विधानसभा क्षेत्र, कार्यक्रमाचे अध्यक्ष ऋषीजी राऊत अध्यक्ष अखिल कुणबी समाज मंडळ ब्रम्हपुरी, प्रमुख अतिथी म्हणून दामोधरजी मिसार संचालक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक चंद्रपूर, डॉ. सतीश दोनाडकर ब्रह्मपुरी, प्रमोद चिमुरकर, माजी जिल्हा परिषद सदस्य चंद्रपूर, क्रिष्णा सहारे माजी उपाध्यक्ष जि.प. चंद्रपूर, प्रेमालाल धोटे व अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी समस्त समाज बांधवांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अखिल कुणबी समाज मंडळ, कुणबी समाज संघर्ष समिती, महिला, युवा मंडळ समिती ब्रह्मपुरी यांनी केले आहे.

**... QUOTES ...**

"I suppose leadership at one time meant muscles; but today it means getting along with people."

- Mahatma Gandhi

# भाकपचा शताब्दी महोत्सवानिमित्य महाएल्गार मेळावा



ब्रह्मपुरी/का.प्र.

देशाला स्वातंत्र्य मिळाले नसताना सुद्धा २६ डिसेंबर १९२५ रोजी उत्तर प्रदेशात कानपूर येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाची स्थापना झाली. तेव्हापासून शेतकरी, शेतमजूर, दलित, शोषित, वंचित, आदिवासी, महिला, विद्यार्थी युवक व इतर घटकातील सर्वांसाठी, कामगारांसाठी पक्षाचा अविरत संघर्ष सूरू असून त्याग, बलिदान संघर्ष व जनतेची सेवा करीत भारतीय कम्युनिस्ट पक्षाचा स्थापना दिवसाला १०० वर्ष पूर्ण झाल्याने शताब्दी महोत्सव ब्रह्मपुरी तालुक्यातील आवळगाव येथे शनिवार, दिनांक २४ जानेवारीला आयोजित करण्यात आला.

या शताब्दी महा एल्गार मेळावा महोत्सवाचे उद्घाटन राजन क्षीरसागर राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय किसान सभा नवी दिल्ली यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी प्रा नामदेव कन्नाके होते. प्रमुख वक्ते म्हणून बबली रावत, श्याम काळे राज्य सहसचिवक नागपूर, डॉ. महेश कोपुलवारउपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून अशोक रामटेके, मिलिंद भनारे जिल्हाध्यक्ष एकलव्य सेना, शिवसेनेचे भूषण रामटेके, विनोद नवघडे, भाकप चे जिल्हा सचिव रवींद्र उमाटे, देवराव चवळे, ॲड जगदीश मेश्राम, आवळगाव चे सरपंच प्रीतम बाबनवाडे, आयटक चे अध्यक्ष एन.टी.म्हस्के, दिलीप बर्गि, प्रदीप चिताडे, राजु गईनवार, प्रकाश रेड्डी, महिला नेत्या ज्योती अंडरशहारे, वनिता कुणटावार, निकिता नीर, कुंदा कोहपरे, किरण धोंगडे, महेंद्र सोंडवले, श्रीधर वाढई, विनोद राऊत, केशव बानबले, दादा आष्टेकर याच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विनोद झोडगे यांनी केले. भारतीय कम्युनिस्ट पार्टीच्या वतीने समाजात उल्लेखनीय कार्याबद्दल युवक युवती पुरुष महिला व ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

**चारोळी**

*आम्ही देशाला लुटतो*
*तुम्ही परस्परांना लुटा...*
*आम्ही 'जेब भरो' करतो,*
*तुम्ही 'जेल भरो' करा...*

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# आणीबाणी संघर्ष नायक बाबुराव लांबे यांचा कुटूंबप्रमुख म्हणून प्रा. संजय लांबे यांचा सत्कार

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील सेवेनिमित्त रहिवासी व भद्रावती येथील मुळ निवासी प्रा. संजय लांबे यांचा लोकसेवा मंडळ संचालित लोकमान्य विद्यालय तथा कनिष्ठ महाविद्यालय भद्रावती येथे विद्यालयाच्या अमृत महोत्सवी प्रसंगी त्या शाळेचे प्रथम मुख्याध्यापक व मंडळाचे सचिव आणि आजीव सदस्य स्व. बाबुराव लांबे हे आणिबाणीच्या काळात मीसाबंदी म्हणून त्यांना १९ महिने नाशिक येथे बंदीवान होते. त्यांचे स्मरण म्हणून या अमृतमहोत्सवी प्रसंगी त्यांच्या नंतर कुटुंब प्रमुख म्हणून प्रा. संजय लांबे यांचा लोकसेवा मंडळाचे अध्यक्ष मा. चंद्रकांत गुंडावार, गोपाळ ठेंगणे सदस्य, नामदेवरा कोल्हे मंडळाचे माजी सचिव यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व मेमोंटो देवुन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी लोकसेवा मंडळाचे सहसचिव अमित गुंडावार, सचिव उल्हास भास्करराव, सदस्य उमाकांत गुंडावार, महाविद्यालयाचे प्राचार्य रूपचंद धारणे, दै.अधिकारनामाचे शहर प्रतिनिधी नंदकिशोर गुड्डेवार, शरद लांबे, माजी नगरसेवक अतुल पाटील गौरशेटीवार, अमृत महोत्सवाचे समन्वयक प्रा, सचिन सरपटवार, शिक्षक प्रतिक नारळे उपस्थित होते.

नियमित वाचा
अर्धसाप्ताहिक
ब्रम्हपुरी समाचार

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा






ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिवस जल्लोषात साजरा करण्यात आला. याप्रसंगी नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेचे सचिव अशोक भैया यांचे शुभहस्ते ध्वजारोहणाचा सोहळा उत्साहात पार पडला. याप्रसंगी अनेक मान्यवर अजय भट्टड, अग्रवाल सर, छाबडा सर, ने. हि. शिक्षण संस्थेचे सदस्य तथा माजी नगरसेवक गौरव भैया, डॉ. आखाडे, डॉ. बनवाडे, डॉ. राखडे उपस्थित होते. एल. एम. बी. पब्लिक स्कुलच्या संचालिका आशिता भैया मॅडम, प्राचार्य कादिर कुरेशी सर, उपप्राचार्य रश्मी राठी मॅडम व पर्यवेक्षिका रश्मी झोले मॅडम यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडल्यानंतर स्कुलच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी वाद्यवृंदांच्या सुरेल साथीने विद्यार्थ्यांनी सुरेख देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण केले. संपूर्ण आसमंत देशभक्तीच्या वातावरणाने भारावला. शाळेच्या विद्यार्थ्यांनी विविध राज्यातील नृत्यप्रकार सादर केले. 'मिले सुर मेरा तुम्हारा' या नृत्याद्वारे विविधतेतुन एकतेचा संदेश देण्यात आला. विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून शाळेमध्ये उत्साहाच्या वातावरणात राष्ट्रीय सण साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संगीत शिक्षक हेमंत खोब्रागडे सर यांचे उत्तम मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभले. तसेच नृत्यशिक्षिका रश्मी झोडे मॅडम यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन वर्ग ९ वी च्या विद्यार्थीनी अविशी बन्सोड व निधी निमगडे यांनी केले. याप्रसंगी संपूर्ण शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# ने.हि. महाविद्यालयातील फराहखान पठाणला दोन सुवर्णपदक

ब्रह्मपुरी/का.प्र.

येथील नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयातील




पदव्युत्तर मराठी विभागातील सत्र २०२४-२५ मधिल विद्यार्थिनी कु. फराहनाज जब्बारखान पठाणला नुकत्याच झालेल्या गोंडवाना विद्यापीठाच्या १३ दीक्षांत समारंभात सर्वप्रथम आल्याबद्दल दोन सुवर्णपदक मान्यवरांच्या हस्ते बहाल करण्यात आली. कुलगुरु डॉ प्रशांत बोकारे, प्र - कुलगुरू डॉ श्रीराम कावळे, कुलसचिव डॉ अनिल हिरेखान यांनी फराहनाजला दोन सुवर्णपदक देऊन सन्मानित केले.

या यशाबद्दल नेवजाबाई भैया हितकारिणी शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष श्रीमती स्नेहलताताई भैया, उपाध्यक्ष ॲड प्रकाश भैया, सचिव अशोक भैया, ज्येष्ठ सदस्य प्रा जी एन केला, गौरव भैया, प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर, विभागप्रमुख डॉ धनराज खानोरकर, डॉ प्रकाश वट्टी, डॉ पद्माकर वानखडे व इतर सर्व कर्मचारी वर्गाने तिचे हार्दिक अभिनंदन करुन पुढील वाटचालीस तिला शुभेच्छा दिल्या आहेत.

❀❀❀❀❀❀❀

Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.



प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.




# प्रजासत्ताक दिनी ब्रम्हपुरी रक्ताची...

(पान क्र. १ वरून)

खासगी रुग्णालयातील आयसीयू (छ्ळ) मध्ये मृत्यूशी झुंज देत आहे. तर रौनक नागापुरे याच्या पायाला गंभीर दुखापत झाली आहे. विशेष म्हणजे, अपघात घडल्यानंतर माणुसकी दाखवून जखमींना मदत करण्याऐवजी चालक ट्रॅक्टरसह घटना-स्थळावरून पसार झाल्याचे लोक चर्चेद्वारे कळते. फिर्यादी सोनू भुते यांच्या तक्रारीवरून आरोपी दुर्योधन तलमले त्याचे विरुद्ध ब्रह्मपुरी पोलीस ठाण्यात कलम २८१, १२५(A), १२५(B) BNS सह १८४, १३४ MV Act अन्वये गुन्हा नोंद केला असून पुढील तपास पोहवा तेजराम जनबंधू हे करीत आहेत.

## प्रशासनाची मूक संमती की लाचखोरी?

ब्रह्मपुरी परिसरात अवैध रेती तस्करीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रजासत्ताक दिनासारख्या राष्ट्रीय सणाच्या दिवशीही पहाटेपासून हे मृत्यूचे दूत रस्त्यावर धावत आहेत. 'शाळेत जाणाऱ्या लहान मुलांच्या रक्ताने रस्ते माखत असताना महसूल आणि पोलीस प्रशासन झोपेचे सोंग घेत आहे का?' असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. रेती तस्करांना कोणाचे अभय आहे? प्रशासनाच्या या 'मूक संमती' मुळेच आज एका कोवळया विद्यार्थ्याचा जीव धोक्यात आला असल्याची भावना जनमानसात उमटत आहे.

अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार
वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs

आजच अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचारचे वार्षिक वर्गणीदार व्हा...
: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर, विद्यानगर, ब्रम्हपुरी
: अंक व जाहिरातींसाठी संपर्क :
महेश पिलारे मो. ९५०३९००९६४
प्रा. विजय मुडे सर मो. ८९७५७९५३९५

बुधवार बंद
दुकानाची वेळ सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Lubi PUMPS·MOTORS
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404